**नियमित दिवाणी कज्ञा क्र. ११७/२०२२ मधील नि.क्र. ६७ वरील आदेश**

( पारीत दिनांक – ०२/१२/२०२४)

सुनिता शिवाजी पाटील वि. लक्ष्मण रामचंद्र गेंगे इ.०८

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुत कामातील कलम १ मधील उपकलम (ब) मध्ये तिस–या ओळीत क्षेत्रा पैकी हे.०.७८ असे नमुद झाले आहे. वास्तविक वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे क्षेत्र हे ०.७०.६८ इतके आहे. त्यामुळे, सदर क्षेत्रा पैकी 'हे.०.७८' याऐवजी 'हे.७०.६८; असे समाविष्ट करणेस परवानगी मिळण्याबाबत सदरचा दुरुस्ती अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदरील अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले असून सदरचा अर्ज खोटा, चुकीचा व लबाडीचा असून प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. सदरची दुरुस्ती वादी यांना मागता येत नाही व येणार नाही कारण सदर दुरुस्ती केल्याने दाव्याचे स्वरुप बदलत आहे. सदर नि.५ वर आदेश झालेला आहे. वादी यांना काम प्रलंबित करणेचे हेतूने दिसून येत आहे. तसेच प्रतिवादी यांना आर्थिक व मानसिक त्रास देणेकरीता सदर वादी यांनी अर्ज दाखल केलेचे दिसून येते. त्यामुळे, वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत यावा व खर्च स्वरुपात रक्कम रु. ५०००/– करण्यात यावी अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणी दावा हा वाटपाकरीता व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत प्रकरणातील कलम १ मधील उपकलम (ब) मध्ये तिस–या ओळीमध्ये ''हे.०.७८'' याऐवजी ''हे.७०.६८'' अशी दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. प्रस्तुत प्रकरणात वादीचा निशाणी क्र. ५ वरील अर्ज अंशतः मंजूर झालेला असून प्रस्तुत प्रकरणात मुद्दे काढलेले असून प्रकरण सुनावणीवर आहे.

प्रस्तुत अर्जामध्ये वादीने वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र तयार करीत असताना दाव्यामध्ये काही टंकलेखनाच्या चुका आढळून आल्याने सदरच्या चुका दुरुस्त करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दिल्याचे कथन केले आहे. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता तसेच दुरुस्तीच्या स्वरुपाचा विचार करता सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचे स्वरुप बदलेल असे निश्चितच वाटत नाही. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी असल्याने दावा मिळकतींचे अचुक वर्णन प्रस्तुत दाव्याच्या योग्य न्यायनिर्णयासाठी अभिलेखावर येणे गरजेचे असल्याने सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

**<u>– आ दे श –</u>**

१) अर्ज (निशाणी क्र.६७) वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रु. ५००/– खर्च (cost) स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी मंजूर दुरुस्ती अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी.

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2024.12.02 17:47:43 +0900

कागल. **(प्रणिता एस.पाटील)**

दिनांक – ०२/१२/२०२४ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.